# २६. यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य



**प्रा. शोभा भिमप्पा कानडे**
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.
**डॉ. संदीप संभाजी तारदाळकर**
इतिहास विभाग प्रमुख, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र हे अनेक क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य आहे. देशात आज महाराष्ट्राला हे स्थान मिळवून देण्यात अनेकांचा सहभाग आहे. राजकारणी, समाजसुधारक, अभ्यासक, वैज्ञानिक, साहित्यिक इत्यादींनी महाराष्ट्र घडवण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. महाराष्ट्राला आजपर्यंत जे मुख्यमंत्री लाभले त्यातील काही मुख्यमंत्र्यांचा महाराष्ट्राला सर्वच क्षेत्रात पुढे नेण्यात महत्त्वाचा वाटा आहे. त्यांची धोरणे, निर्णय त्यांची व्यक्तिमत्वे इत्यादी बाबींचा महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक जडणघडणीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. या शोधनिबंधात महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य याचा आढावा घेतला आहे.

**यशवंतराव चव्हाण**

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्र येथे १२ मार्च १९१३ रोजी झाला. सातवाहनांच्या राज्यानंतर छोटी मोठी राज्ये उदयाला आली त्यात देवराष्ट्र हे एक होते. त्याची राजधानी होती कौडिंन्यपूर. नंतर तिचे नाव कुंडल पडले.[१] वडील बळवंतराव हे विट्याजवळ असलेली थोडी शेती पाहत. पण कोरडवाहू जमीन काही फारसे उत्पन्न देत नसे. तेंव्हा नोकरीच्या शोधात बळवंतरावांना फिरावे लागले, पण नंतर त्यांना बेलिफाची नोकरी मिळाली. ज्ञानोबा, गणपतराव हे दोन भाऊ आणि राधाबाई ही बहीण अशी यशवंतरावांना तीन भावंडे होती. आई विठाबाई या निरक्षर होत्या पण शिक्षणाचे महत्व जाणत होत्या. [२]

यशवंतराव पदवी परीक्षेपर्यंत शिकले.वकिलीच्या परीक्षेतही यशस्वी होऊन काही काळ वकिली केली . पण स्वातंत्र्य चळवळीत सामील होऊन कॉंग्रेसच्या राजकारणात सक्रिय होता होता १९४६ साली ते गृह खात्याचे संसदीय सचिव झाले. आणि पुढे द्वैभाषिकाचे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ; संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र अशा खात्यांचे मंत्री होत उपपंतप्रधानापर्यंत चढले.[३] त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला एक विवेकी व सुसंस्कृत नेतृत्व लाभून महाराष्ट्राच्या जीवनावर त्यांनी आपला ठसा कायमचा उमटवला.

**यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार**

'ग्रामीण शिक्षणाची माझी कल्पना' या भाषणात यशवंतराव ग्रामीण शिक्षणासंबंधीची कल्पना मांडतात. पुस्तक वाचून येणारे ज्ञान ते शिक्षण असे समजण्याची एक मोठी प्रथा आहे ती काही अंशी बरोबरही आहे, यशवंतराव शिक्षणाची व्याख्या करताना म्हणतात 'शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही अंशी संगती लावता येते त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो,आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते आणि समजावून देता येते म्हणजे हे शिक्षण'. अशी शिक्षणाची अतिशय योग्य व्याख्या